**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला –444 104**

**निम्न कृषि शिक्षण विद्याशाखा**

**फोन : 2258706** **फॅक्स् : 0724 2258219, 2258419**

---

## प्रस्तावीक :

भारत हा कृषि प्रधान देश आहे. देशाची उन्नती कृषि विकासाशिवाय होणे शक्य नाही हे जाणून शेती व्यवस्थापनात शास्त्रीय दृष्टीकोन यावा. राष्ट्र समृध्द व्हावे यासाठी कृषि विषयक शिक्षणाची गरज असल्याचे आणि याकरीता कृषि विद्यापीठांची स्थापना करुन अद्यावत कृषि संशोधन शेतक–यांना पोहचविण्या विषयीचे प्रगत विचार डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुखांनी मांडलेले होते. त्यांच्या विचारावर आधारीत कृषि विद्यापीठे स्थापन झालीत. सन 1974 मध्ये जिल्हा परिषदेकडून कृषि विद्यालये कृषि विद्यापीठाकडे वर्ग करण्यात आलीत.

कृषि विद्यापीठातील व्दिवर्षीय कृषि तंत्र पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रात्यक्षिकाभिमुख करुन स्वानुभवावर आधारीत आहे. या अभ्यासक्रमातंर्गत पिकांचे नियोजन, आखणी, बिजोत्पादन तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, काढणी, मळणी, शेतमालांच्या प्रक्रिया आणि विक्रीपर्यंत सर्व कामात सहभागी करुन घेऊन कृषि तंत्रकलेत पारंगत करण्याचा प्रयत्न केला जातो.

कृषि पदविकाधारक विद्यार्थी कृषि सहाय्यक, ग्रामसेवक, ग्रामविस्तार अधिकारी, ग्रुप–सचिव, पटवारी ई. पदासाठी पात्र ठरतात. हेच विद्यार्थी शेतक–यांच्या प्रत्यक्ष संपर्कात राहून शासनाच्या विविध योजना राबविण्यास प्रत्यक्षपणे कारणीभुत ठरतात. महाराष्ट्र राज्यातील इयत्ता 10 वी पास विद्यार्थी या पदविकेसाठी पात्र असून शिक्षणाचे माध्यम मराठी आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांअतर्गत निम्न कृषि शिक्षण ही स्वतंत्र विद्याशाखा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शेती विषयक प्रगत ज्ञान प्राप्त करुन स्वंयरोजगार निर्माण करावा असा उध्देश ह्या शाखेअंतर्गत शिकविण्यात येणा–या विविध अभ्यासक्रमांचा आहे.

ह्या शाखेअंतर्गत खालील अभ्यासक्रम राबविण्यात येतात.

## 1. व्दिवर्षीय कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम :

हा अभ्यासक्रम विद्यापीठाअंतर्गत घटक, संलग्न व मान्यताप्राप्त (विना अनुदानित) अशा एकूण 54 कृषि तंत्र विद्यालयातून शिकवण्यात येत आहे. हा अभ्यासक्रम प्रात्यक्षीकभिमुख स्वानुभवावर आधारीत असून तांत्रिक शिक्षणाव्दारे विद्यार्थ्यांना शेतीचे प्रगत ज्ञान प्राप्त होऊन ते स्वंयरोजगार निर्माण करु शकतात. प्रवेश पात्रता 10 वी उत्तीर्ण असून शिक्षणाचे माध्यम मराठी आहे.

अनुदानित कृशि तंत्र विद्यालयांचे शुल्क आकारणी प्रथम वर्षाकरीता एकूण रु. 5,960/– व द्वितीय वर्षाकरीता रु. 5,430/– तर विना अनुदानित मान्यताप्राप्त कृशि तंत्र विद्यालयांचे शुल्क आकारणी प्रथम वर्षाकरीता एकूण रु. 13,460/– तर व्दितीय वर्षाकरीता रु. 12,930/– एवढी आहे.

**2. व्दिवर्षीय कृषि विज्ञान पदविका :**

हा अभ्यासक्रम ग्रामीण शिक्षण संस्था, अमरावती व वर्धा ह्या विद्यापीठाच्या संलग्न संस्थेमधून शिकविल्या जातो. नागपूर राजस्व विभागातील विद्यार्थ्यांना वर्धा येथे व अमरावती राजस्व विभागातील विद्यार्थ्यांना अमरावती येथे प्रवेश दिल्या जातो. हा अभ्यासक्रम वर्ग 12 वी समकक्ष असल्यामुळे शेतीच्या प्रगत ज्ञानाशिवाय विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशास पात्र आहे. प्रवेश पात्रता वर्ग 10 वी उत्तीर्ण असून शिक्षणाचे माध्यम इंग्रजी आहे.

प्रथम वर्ष प्रवेश शुल्क आकारणी एकूण रु. 3,661/— तर द्वितीय वर्षाकरीता एकूण रु. 3,291/— एवढी आहे.

**3. माळी प्रशिक्षण :**

हा एक वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाच्या नागपूर व अकोला येथील घटक केंद्रामध्ये राबविल्या जातो. नागपूर, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नागपूर केंद्रमध्ये तर अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना अकोला केंद्रामध्ये प्रवेश दिल्या जातो. ह्या अभ्यासक्रमाद्वारे फळझाडे, भाजीपाला व फुलझाडे यांची लागवड, किडींचा बंदोबस्त, रोपवाटीका व बागायती कामे ईत्यादींचे विस्तृत ज्ञान प्राप्त होते व ग्रामीण युवकामध्ये बागायती उद्योग धंदयाबाबत आत्मविश्वास निर्माण होतो. ह्या प्रशिक्षणाची प्रवेश पात्रता 8 वा वर्ग उत्तीर्ण आहे.

या करीता शैक्षणीक शुल्क आकारणी रु. 25/— एवढी आहे व इतर शुल्क विद्यापीठ ठरविल त्यानुसार भरावयाचे आहे.

**निम्न कृषि शिक्षण शाखेच्या नियंत्रणात खालील घटक, संलग्न आणि विना अनुदानित मान्यताप्राप्त संस्था आहेत. त्याबाबत माहीती खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | घटक | संलग्न | मान्यताप्राप्त विना अनुदानित | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| 1. | ग्रामीण शिक्षण संस्था **(द्विवर्षीय कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रम)** | — | 02 | — | 40 |
| 2. | कृषि तंत्र विद्यालय **(व्दिवर्षीय कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम)** | 07 | 01 | 46 | 60 |
| 3. | **माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र** | 02 | — | — | 40+25 |